तंत्रज्ञान अधिविभाग.
दि. १०.०९.२०२५

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना शिष्यवृत्तीबाबत महत्वाची सुचना

तंत्रज्ञान अधिविभागातील सर्व बी. टेक. अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील प्रवेशीत विदयार्थ्यांना कळविणेत येते की, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विषेश मागास प्रवर्गामधील उच्च शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी व वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी प्रवेश अर्ज https://hmas.mahait.org या शासनाच्या ऑनलाईन संकेतस्थळावर अर्ज दिनांक १८.०९.२०२५ रोजीपर्यंत भरावयाचा आहे. कृपया सर्व विदयार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

प्र.संचालक
I/c Director
Department of Technology
Shivaji University, Kolhapur

इतर मागासवर्ग,विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह प्रवेश, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशाचे वेळापत्रक...

---

राज्यातील इतर मागासवर्ग,विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी व वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी प्रवेश अर्ज https://hmas.mahait.org या शासनाच्या ऑनलाईन संकेतस्थळावर अर्ज मागविण्याबाबत वेळापत्रक निश्चित झालेले आहेत.

**शासकीय वसतीगृह असलेल्या जिल्हयासाठी सन २०२५-२६ साठी वसतीगृह, पंडीत दिनदयाळ स्वंयम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार यासाठी अर्ज करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे**

| बाब | प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी | अर्ज छानणी करावयाचा कालावधी | पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम करणे व प्रसिध्द करणे | पहिली निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत | रिक्त जागेवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार निवड यादी प्रसिध्द करण | दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची अंतिम मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १२ वी नंतरच्या व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास (विगर व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) | दिनांक ०१/०९/२०२५ ते १८/०९/२०२५ | दिनांक १९/०९/२०२५ ते २४/०९/२०२५ | दिनांक २५/०९/२०२५ | दिनांक ०६/१०/२०२५ | दिनांक ०९/१०/२०२५ | दिनांक १७/१०/२०२५ |

टिप:- शासकीय वसतीगृहासाठी पात्र असलेल्या तथापि गुणवत्तेनुसार व वसतीगृहाच्या क्षमतेअभावी वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी विचारात घेतले जातील.

तरी वरील वेळापत्रानुसार या योजनेसाठी पात्र असणाऱ्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील नमूद कालावधीत https://hmas.mahait.org शासनाच्या या संकेतस्थळावर अर्ज भरावेत.तसेच अधिक माहितीसाठी सहायक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण कोल्हापूर, तिसरा मजला,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन विचारे माळ,बावर हॉस्पीटल जवळ,कोल्हापूर या कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहन श्रीम.सुनिता नेर्लीकर,सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर यांनी केले आहे.

सुनिता नेर्लीकर
सहायक संचालक,
इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर.

# ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले आधार योजना 2025 पात्रता

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना 2025 च्या लाभांसाठी अर्ज करण्यासाठी आणि त्याचा लाभ घेण्यासाठी, सरकारने विशिष्ट पात्रता निकष निश्चित केले आहेत जे विद्यार्थ्यांना पूर्ण करणे आवश्यक आहे:

- अर्जदार विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
- अपंग श्रेणीतील विद्यार्थ्यांसाठी, 40% पेक्षा जास्त अपंगत्वाचे प्रमाणपत्र जिल्हा शल्यचिकित्सकाकडून मिळणे बंधनकारक आहे.
- अर्जदार ओबीसी प्रवर्गातील असणे आवश्यक आहे आणि त्याचा पुरावा म्हणून जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- अनाथ प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाच्या सक्षम अधिकाऱ्याद्वारे दिलेले अनाथत्व प्रमाणपत्र सादर करावे लागेल.
- विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न 2.50 लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.
- विद्यार्थ्याचे बँक खाते त्यांच्या आधार कार्डशी लिंक केलेले असणे आवश्यक आहे.
- अर्जदार विद्यार्थी दुसऱ्या शहरात शिक्षण घेत असल्यास आणि वसतिगृहात किंवा भाड्याने घेतलेल्या खोलीत राहत असल्यास त्यांना पात्रता मिळेल.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना 2025 साठी आवश्यक कागदपत्रे

- .आधार कार्ड
- जात प्रमाणपत्र
- पत्त्याचा पुरावा (राशन कार्ड, वीज बिल, टेलिफोन बिल इ.)
- उत्पन्न प्रमाणपत्र (जर आवश्यक असल्यास)
- 10वी आणि 12वीची मार्कशीट
- शाळा/महाविद्यालयात प्रवेशाचा पुरावा (प्रवेशपत्रक, दाखलापत्र इ.)
- मोबाईल नंबर
- बँक खाते पासबुक
- पासपोर्ट आकाराचा फोटो